दाखल दिनांक : ३.१.२०२५
नोंदणी दिनांक : ४.१.२०२५
निकाल दिनांक : १०.१.२०२५
कालावधी : ०० वर्ष ०० महिने ०७ दिवस

## शरद जी.देशपांडे आयुक्त, कर्मचारी नुकसान भरपाई कायदा, तथा न्यायाधीश, प्रथम कामगार न्यायालय, अहमदनगर यांचेसमोर

ओ–१

## अर्ज डब्ल्यु.सी. "A" क्र. १/२०२५

**(CNR No. MHLC160000032025)**

१. सुलताना समीर शेख,
वय – ४२ वर्षे, धंदा–घरकाम

२. अफरीन समीर शेख
वय– २३ वर्षे, धंदा–घरकाम

३. अमन समीर शेख
वय– २१ वर्षे, धंदा– शिक्षण

४. नाजमीन समीर शेख
वय– १९ वर्षे, धंदा– शिक्षण

५. मोहम्मद अरकान समीर शेख
वय– १३ वर्षे, धंदा–शिक्षण

६. अल फैज समीर शेख
वय– ५ वर्षे, धंदा– शिक्षण
सर्व रा. मदिना नगर, संगमनेर,
ता.संगमनेर, जि. अहमदनगर ...**अर्जदार.**

**विरुध्द**

१. साईधारा दुध,
मु.पो. हसनाबाद, तळेगांव दिघे,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर

२. मॅनेजर,
युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कं.मर्या.
मु.पो. दुसरा मजला,सहयाद्री कॉलेजजवळ,
नाशिक रोड,संगमनेर,
ता.संगमनेर, जि.अहमदनगर. ...**सामनेवाले.**

**नि. यु– १ वरील आदेश**
(दि : १०.१.२०२५)

१. अर्ज वाचला. तसेच, अर्जदार यांनी नि.यु– २ वर दाखल केलेले प्रतिज्ञापत्र तसेच नि. यु–३ वर दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेतली. अर्जदार वकीलांचा तोंडी युक्तीवाद ऐकला.

२. या प्रकरणी न्यायालयाचे वरिष्ठ लिपीक यांचा अहवाल मागवला होता तो स्वतंत्र कागदावर सादर आहे तो पाहिला व विचारात घेतला. सामनेवाले नं.२ युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी यांनी नुकसान भरपाई रक्कम रु.१८,९३,०९४/– (अक्षरी अठरा लाख त्र्याण्णव हजार चौ–याएंशी रु.) या न्यायालयाच्या 'सी' रजिस्टर मधील नोंद क्र. ३५/२५.११.२०२४ नुसार स्टेट बॅक ऑफ इंडिया, सावेडी, अहमदनगर येथे जमा केली आहे.

३. या प्रकरणी श्रमिक नुकसान भरपाई कायदा कलम ८(४) नुसार आवश्यक ती चौकशी करण्यात आली.

४. या प्रकरणात अर्जदार यांनी नि. यु– १ प्रमाणे वरील नुकसान भरपाईची जमा रक्कम मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी पुराव्याच्या स्वरुपात नि. यु–३ वर कागदपत्रे दाखल केली आहेत. सर्व अर्जदार न्यायालयासमक्ष हजर होवून त्यांनी शपथेवर निवदेन दिलेले आहे. न्यायालयाने आवश्यक ती पडताळणी केलेली आहे. नि.यु–३ सोबत दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता तसेच केलेल्या चौकशीच्या आधारे असे दिसते की, अर्जदार नं. १ मयताची पत्नी असून अर्जदार नं. २ ते ६ अनुक्रमे अफरिन, अमन, नाजमीन, मोहमंद अरकान, अल फैज ही त्याची मुले व मुली आहेत. अर्जदार नं. १ हिचे पतीचे अपघाती निधन झाल्याने त्यांची आर्थीक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांना पैशांची आवश्यकता आहे असे म्हटले आहे. परंतु, अर्जदार नं. ५ व ६ वयाने खूप लहान असल्याने त्यांच्या भविष्याची ही तरतूद करणे मला गरजेचे वाटते. त्यामुळे त्यांचे भविष्याचे हित लक्षात घेता त्यांचे हिश्याची रक्कम मुदत ठेवीत ठेवणे गरजेचे वाटते तसेच एका मुलीचे लग्न व्हायचे आहे. तरी अर्जदार यांची गरज लक्षात घेता, अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होईल असे वाटते. सबब, वाटपाच्या संदर्भात खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे–

**:आदेश:**

१. न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.१८,९३,०९४/– (अक्षरी अठरा लाख त्र्याण्णव हजार चौ–यांण्णव रु.) पैकी अर्जदार नं. १ सुलताना समीर शेख यांचे हिश्यावर रु. ३,१५,५९४/–( अक्षरी तीन लाख पंधरा हजार पाचशे चौ–यांण्णव रु.) वर्ग करण्यात यावी. सदर रक्कम अर्जदार नं.१ यांची योग्य ती ओळख पटवून त्यांना एनइएफटीव्दारे/ रेखांकीत धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी अथवा त्यांनी सादर केलेल्या माहितीनुसार त्यांच्या बॅक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

२. न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.१८,९३,०९४/– (अक्षरी अठरा लाख त्र्याण्णव हजार चौ–यांण्णव रु.) पैकी अर्जदार नं. २ अरफीन समीर शेख हिचे हिश्यावर रु. ३,१५,५००/–( अक्षरी तीन लाख पंधरा हजार पाचशे रु.) वर्ग करण्यात यावी. सदर

रक्कम अर्जदार नं.२ हिची योग्य ती ओळख पटवून तिला एनइएफटीव्दारे/ रेखांकीत धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी अथवा तिने सादर केलेल्या माहितीनुसार तिच्या बॅक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

३. न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.१८,९३,०९४/— (अक्षरी अठरा लाख त्र्याण्णव हजार चौ—यांण्णव रु.) पैकी अर्जदार नं. ३ अमन समीर शेख याचे हिश्यावर रु. ३,१५,५००/—( अक्षरी तीन लाख पंधरा हजार पाचशे रु) वर्ग करण्यात यावी. सदर रक्कम अर्जदार नं.३ याची योग्य ती ओळख पटवून त्याला एनइएफटीव्दारे/ रेखांकीत धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी अथवा त्याने सादर केलेल्या माहितीनुसार त्याच्या बॅक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

४. न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.१८,९३,०९४/— (अक्षरी अठरा लाख त्र्याण्णव हजार चौ—यांण्णव रु.) पैकी अर्जदार नं. ४ नाजमीन समीर शेख हिचे हिश्यावर रु. ३,१५,५००/—( अक्षरी तीन लाख पंधरा हजार पाचशे रु.) वर्ग करण्यात यावी. सदर रक्कम अर्जदार नं.४ हिची योग्य ती ओळख पटवून तिला एनइएफटीव्दारे/ रेखांकीत धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी अथवा तिने सादर केलेल्या माहितीनुसार तिच्या बॅक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

५. न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.१८,९३,०९४/— (अक्षरी अठरा लाख त्र्याण्णव हजार चौ—यांण्णव रु.) पैकी अर्जदार नं. ५ मोहमंद अरफान समीर शेख याचे हिश्यावर रु. ३,१५,५००/—(अक्षरी तीन लाख पंधरा हजार पाचशे रु.) वर्ग करण्यात यावी. सदर रक्कम अर्जदार नं. ५ याचे नावे राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये सज्ञान होईपर्यंत मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यात यावी.

६. न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.१८,९३,०९४/— (अक्षरी अठरा लाख त्र्याण्णव हजार चौ—यांण्णव रु.) पैकी अर्जदार नं. ६ अल फैज समीर शेख याचे हिश्यावर रु. ३,१५,५००/—( अक्षरी तीन लाख पंधरा हजार पाचशे रु.) वर्ग करण्यात यावी. सदर रक्कम अर्जदार नं. ६ याचे नावे राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये सज्ञान होईपर्यंत मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यात यावी.

७. अर्जदार नं. ५ व ६ यांचे नावे ठेवलेली मुदत ठेवींच्या रक्कमेची मुदत संपल्यानंतर रक्कम व्याजासह अर्जदार नं. ५ व ६ यांना योग्य ती ओळख पटवून त्यांना एनइएफटीव्दारे/रेखांकीत धनादेशाद्वारे परस्पर अदा करण्यात यावी अथवा त्यांनी सादर केलेल्या माहितीनुसार त्यांच्या बॅक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

८. वरिष्ठ लिपीक यांनी वरील आदेशाची पुर्तता करावी.

सही/—
( शरद जी.देशपांडे )
दि. १०.१.२०२५ आयुक्त, कर्मचारी नुकसान भरपाई कायदा,
तथा न्यायाधीश, प्रथम कामगार न्यायालय, अहमदनगर

युक्तिवाद ऐकल्याचा दि. १०.१.२०२५
न्यायनिर्णय जाहीर केल्याचा दि. १०.१.२०२५
न्यायनिर्णय टंकलिखीत केल्याचा दि.१३.१.२०२५
न्यायनिर्णय तपासून सही केल्याचा दि.१३.१.२०२५